# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २१/११/२०२१ (रविवार )


---

### —: अल्पवयीन मुलीला पळवून येणारा आरोपी गजाआड स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण ची कार्यवाही :—

दिनांक ०१/११/२०२१ रोजी बुटीबोरी पोलीस स्टेशनला हजर येवून फिर्यादी यांनी आपली फिर्याद नोंदविली होती की, त्यांची १२ वर्श ६ महिनेची अल्पवयीन मुलगी ही दिनांक ३१.१०.२१ रोजी सकाळी १०.०० वा.च्या सुमारास किराणा दुकानात जाते असे आपल्या आजी यांना सांगुन घरूण निघुन परत आली नाही. त्यांनी तीचा आजुबाजुच्या परिसरात व नातेवाईकांकडे शोध घेतला ती मिळून आली नाही. फिर्यादीचे रिपोर्ट वर बुटीबोरी पोलीस स्टेशनला पळवून येणारा अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हा नोंद करुन पळवून नेलेली मुलगी व आरोपीचा शोध सुरु करण्यात आला. सदर गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा नाग्रा यांचेकडून सुध्दा सुरु होता. समांतर तपास दरम्यान स्थानिक गुन्हे शाखाचे पथकास गोपनिय सुत्राकडुन माहिती प्राप्त झाली की, पळवून नेलेली मुलगी ही चंद्रपुर जिल्हयातील चंदनखेडा गावात राहत आहेत. मिळालेल्या महितीच्या आधारे नमुद ठिकाणी पथक गेले असता तिथे पळवून नेलेली अल्पवयीन मुलगी व त्या सोबत पळवून नेणार आरोपी नामे सागर कंठीराम परचाके वय २३ वर्ष रा. किनारमडकी ता. नागपूर हे दोघे मिळून आले. त्या दोघाना ताब्यात घेवून पळवून नेणार आरोपी सागर कंठीराम परचाके वय २३ वर्श रा. किनारमडकी ता. नागपूर याची विचारपुस केली असता त्याने सदर मुलीला पळवून नेल्याची कबुली दिली. त्याला पुढील कार्यवाहीसाठी पोलीस स्टेशन बुटीबोरी यांचे स्वाधिन करण्यात आले.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अनिल जिट्टावार, सपोनि जितेन्द्र वैरागडे, पोउपनि जावेद शेख, पोहवा गजेन्द्र चौधरी, महेश जाधव, पोशि अजिज शेख, बालाजी साखरे, चापोहवा भाऊराव खंडाते, तसेच सायबर सेल चे पोशि सतिश राठोड, मपोशि रुपाली मेश्राम यांनी पार पाडली.



## —: आत्महत्यास प्रवृत्त करणे :—

पो.स्टे. नरखेड :— अंतर्गत ८ किमी अंतरावरील मौजा मालापुर येथील निवासी शहाजी जनार्दन राऊत वय ६० वर्ष यांनी शेती लावण्या करीता काटोल निवासी सुमीत चांडक व सुरेन्द्रं ठाकेर यांचे कडुन व्याजाने उसने पैसे घेतले होते. त्या दोघोनी नियमापेक्षा जास्त व्याज आकारून पैसे वसुल देखील झाले असता त्याचे वर सतत व्याज लावत होते मुद्दल व त्यावर लावलेले जास्तीचे व्याज मागण्या करीता अंशुल ठाकेर, सुरेन्द्र ठाकुर तसेच सुमीत चांडक हे वांरवार वारवार फोन करत होते. त्यामुळे शहाजी जनार्दन राऊत यांची मानसीकता बिघडल्याने त्यांनी या त्रासापोठी मालापुर येथील आपल्या शेतात दि.२७/१०/२०२१ रोजी १८.०० वा सुमारास विषारी औषध प्राशन केल्याने त्यांना उपचार करिता ग्रमीण रूग्णालय काटोल येथे प्राथमिक उपचार करून रेफर केल्याने मेडीकल कॉलेज नागपुर येथे पुढील उपचाराकरिता भर्ती करण्ध्यात आले. उपचार सुरु असता त्यांचा दि.०१/११/२०२१ रोजी निधन झाले पोस्टे काटोल येथे मर्ग क्र ७५/२१ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र दि.०६/११/२०२१ रोजी पोलीस स्टेशन नरखेड येथे प्राप्त झाले. मर्ग प्रकरणाची चौकशी दरम्यान मृतकाचे मुलानी पो.स्टे.ला येवून आपली फिर्याद नोंदविली.

सदर प्रकरणी फिर्यादी जगजीत शहाजी राऊत वय २७ वर्षे, रा.मालापुर ह.मु काटोल मो क्र. ९०१९६५८४९१ यांचे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी सुमीत चांडक व सुरेन्द्रं ठाकेर विरुध्द पो.स्टे. नरखेड येथे अप क्रमांक २९५/२१ कलम ३०६,३४ भादवी सहकलम ३९,४४,४५ महाराष्ट्र सावकारी अधि नियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास जयपालसींग गिरासे सा. पो स्टे नरखेड मो क्र ८४१९९४११८८ हे करित आहे.

## —: चोरी (जनावर ):—

पो.स्टे. जलालखेडा :— अंतर्गत २२ किमी अंतरावरील मौजा लोहारी सांवगा शेत शिवारात भिमराव लाहाणुजी फंदी वय ५१ रा.लोहारी सांवगा ता.नरखेड यांची शेती असून दिनांक १९.११.२०२१ रोजी रात्री दरम्यान त्याचे शेतातील गोठयात बांधुन ठेवलेले १) एक १०वर्षाचा बैल पांढ—या रंगाचा २) १२ वर्षाचा बैल पांढ—या रंगाचा जोडीची किंमत ४०, ००० रू ३) एक गीरी जातीचा गाय बछडा किंमत १०, ००० रू तसेच त्यांचे शेताचे बाजुला शंकर आनंदराव कोहळे वय ६५ रा.लोहारी सांवगा यांचे शेतातील गोठयातील एक ७ वर्षाची पांढ—या रंगाची गाय किंमत १२, ००० रू ची एकुण एकुण ६२,००० रू. किमतीचा जनावरे कोणतरी अज्ञात इसमांनी चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी भिमराव लाहाणुजी फंदी वय ५१ रा.लोहारी सांवगा ता.नरखेड मो.नं.९३०९८२२७३६ यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. जलालखेडा येथे अप क्रमांक २१७/२०२१ कलम ३७९ भादवी.अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास स.फौ.देविदास सातंगे मो.नं. ९६७३०१८८०७ हे करित आहे.

## —: चोरी (शेत मोटारपंप):—

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत १० किमी अंतरावरील वलनी शेत शिवारात **भुनेश्वर रूमाजी नरड वय ३९ वर्ष रा. वलनी यांची शेती असून** शेतातील विहीरीवरील इले. मोटार पंप किं. ५,००० रू. + लोखंडी तिफन किं. २५० रू. + लोखंडी सब्बल किं. ५०० रू. + लोखंडी दरवाजा किं. १,००० रू. कानुस उपटण्याचा चिमटा किं. १,००० रू. + चॅनल गेट किं. ५,००० रू. + दुसरे लोखंडी गेट किं. ३,००० रू. + लांखंडी पाईप १० फुटाचे १० नग किं. ५,००० रू. असा एकुण २१,७५० रू. चा माल दिनांक १९/११/२०२१ रोजी कोणीतरी इसमांनी चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी **भुनेश्वर रूमाजी नरड वय ३९ रा. वलनी** यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. खापरखेडा येथे अप क्रमांक ४९१/२१ क. ४६१ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सफौ धांडे मो.क्र. ९७६४४ ०१२४६ हे करित आहे.

पो.स्टे. काटोल :— अंतर्गत ०६ किमी अंतरावरील रीधोरा ते कोढांळी रोडने जाणारा मार्गावर रीधोरा शीवारात **मोहनलालजी नखतमल केला वय ७० वर्श रा तार बाजार काटोलयांची शेती असून सदर शेततून** विहरीमध्ये पाणी

ओलण्याकरीता १) सोलार शक्ती कपंनिची जुनी वापरती मोटार २) व १५ ते २० फुट केबल वायर असे दोन्ही मीळुन की १०.००० रूपयाची मालमत्ता कोणतही अज्ञात इसमांनी दिनांक १९/११/२०२१ चे रात्री चोरुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी **मोहनलालजी नखतमल केला वय ७० वर्श रा तार बाजार काटोल मो न** ९४२२८०५३३० यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. काटोल येथे अप क्रमांक ६००/२०२१ **कलम ३७९ भादवि** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोउपनि दिनेश खोटेले मो न ९४०४०८०६६६ हे करित आहे.

**—: अपघात :—**

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत पारडी शिवारतील हेटी बायपास रोडवर पुलाजवळ १९/११/२०२१ चे २०.३०वा दरम्यान लक्ष्मण श्रावण कडु वय ५२ वर्ष यांची स्प्लेंडर मोटारसायकल क्र. एमएच ४० बीयु ५०९५ ला कोणीतरी आज्ञात वाहन चालकानी आपले वाहन भरधाव निश्काळजीपणाने हलगर्जीपणाने, रस्त्यांचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन चालवुन अपघात करुन पळून गेला सदर अपघात मध्ये लक्ष्मण श्रावण कडु वय ५२ वर्ष हे मरण पावले.

सदर प्रकरणी अनिकेत लक्ष्मण कडु वय २३ वर्ष रा.काकडे ले आउट, वार्ड क्र.८ सावनेर जात कणबी,मो.नं. ९९७०५१६६८० याचे तोंडी रिपोट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. सावनेर येथे अप क्रमांक ७३४/२१कलम २७९, ३०४ (अ) सहकलम १८४, १३४ (अ) मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सपोनि शिवाजी नागवे मो.नं.९८२३४०३५६५ हे करित आहे.

—: अकस्मात मृत्यु :—

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत वार्ड क्रं.३ बिना संगम. येथील निवासी राजेश मारोती भिमटे वय २२ यांची पत्नी १५ ते २० दिवसापुर्वी पासुन माहेरी कामठी येथे मुलाबाळासह राहण्यास गेलेली आहे. तसेच याला त्याची पत्नी हिचे चारीत्र्यावर संशय होता. राजेश मारोती भिमटे वय २२ यांनी दिनांक १९/११/२१ चे २२/०० वा. दरम्यान मानसकि तणावात आपले राहते घराचे दार आतुन बंद करून स्वयंपाक रूम चे सीलींग फॅन लावण्याचचे कडीला पोपटी रंगाची प्लास्टीक नायलॉन दोरी बांधुन गळफास तयार करून गळफास लावुन आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे अ.मृ.क्रमांक ६४/२०२१ कलम १७४ जाफौ अन्वये प्रकरणे नोंद करण्यात आला असून पुढील चौकशी पोना रेवतकर मो नं.९५४५५२३७३६ हे करित आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर